# राजापुरात २८ नोव्हेंबरला श्रीधर फडके यांचा 'फिटे अंधाराचे जाळे' कार्यक्रम

▶ राजापूर *(प्रतिनिधी)*

नुकत्याच पार पडलेल्या तेजोमय व चैतन्यदायी दिवाळीच्या उत्साहात भर पाडण्यासाठी आसमंत रत्नागिरी आणि मित्रमेळा राजापूर सुप्रसिध्द गायक संगीतकार श्रीधर फडके यांच्या सुरेल मैफिलीची मेजवानी घेवून आले आहेत. राजापूर हायस्कूलच्या क्रिडांगणावर शनिवार २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता श्रीधर फडके यांचा 'फिटे अंधाराचे जाळे' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राजापूरकर रसिकांसाठी ही आगळी वेगळी पर्वणी ठरणार आहे.

संगीतकार व गायक श्रीधर फडके यांचे 'अबोलीचे बोल, ऋतु हिरवा, ओमकार स्वरूपा, तेजोमय नाद ब्रह्म असे अनेक बहारदार अल्बम तसेच त्यांनी गायलेली गाणीही रसिकांच्या मनात रूंजी घालत आहेत. त्यांची गाणी व त्या गाण्यांविषयी ऐकताना श्रोते मंत्रमुग्ध होऊन जातात. हा अनुभव राजापूरकरांना घेता येणार आहे.



आजपर्यंत मित्रमेळाने आगळ्या वेगळ्या दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन करून राजापूरच्या सांस्कृतिक चळवळीत स्वतंत्र मोहोर उमटवली आहे. भव्य असा पालखी सोहळा, संगीतकार कौशल इनामदार, गझल नवाज भिमराव पांचाळे, ज्येष्ठ गायिका फैयाज, प्रसिद्ध जलतरंग वादक मिलिंद तुळणकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे ओजस्वी व्याख्यान अशा अनेकविध कार्यक्रमांतून राजापूरकरांचे मनोरंजन व प्रबोधन केले आहे.

प्रसिद्ध गायक श्रीधर फडके यांची फिटे अंधाराचे जाळे ही मैफिल राजापूरकर रसिकांना एक पर्वणी ठरेल. भव्य स्टेज व आसन व्यवस्था असलेला हा कार्यक्रम विनामुल्य असून त्याचा रसिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आसमंत व मित्रमेळाचे वतीने करण्यात आले आहे.